दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र • रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक-११५ • पाने ४ • किंमत ४ रुपये

## दिल्लीकरांवरील 'आप'चे संकट दूर झाले

**मुंबई**–दिल्लीकरांवरील 'आप'चे संकट दूर झाले असल्याचे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली निवडणुकीच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस पक्षाला मतदारांनी चारी मुंडा चीट केले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. इतकच नाही तर या विजया बद्दल त्यांनी भारतीय जनता पक्षाचे देखील अभिनंदन केले आहे. दिल्लीतील मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाचे अभिनंदन केले आहे. या माध्यमातून खोटेपणा हरला आणि खरेपणाला मतदारांनी भरभर साथ दिली असल्याचा दावा देखील एकनाथ शिंदे यांनी केला आहे. आता आपला देश आर्थिक महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. यावर मतदारांनी पूर्ण विश्वास व्यक्त केला असल्याचे देखील एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

# दिल्लीत २७ वर्षांनी कमळ फुलले

## 'आप'चा गड ढासळला, तर काँग्रेसचा सुपडासाफ; भाजपची मोठी खेळी

**दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिल्ली विधानसभा निवडणुकांचे जे निकाल समोर आले आहेत ते पूर्णपणे अनपेक्षित असे आहेत. भाजपने (इगझ) यंदा मोठी मुसंडी मारत दणदणीत विजय संपादन केलाय. शिवाय अनेक दिग्गजांनाही धक्का दिला आहे. ज्या आम आदमी पक्षाने नव्या प्रकारचे राजकारण सुरू केले होते आणि ज्यात दिल्ली बदलण्याची क्षमता असल्याचे बोललं जात होतं, त्याच पक्षाला त्यांच्या गडातून उखडले गेले आहे.

नवी दिल्लीच्या जागेवरून अरविंद केजरीवाल स्वतः पराभूत झाले, आहेत. तर मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन हे देखील पराभूत झाले आहेत. आता हे सर्व घडले याचा अर्थ भाजपने नक्कीच मोठी खेळी खेळत मतदारांचा विश्वास जिंकला आहे. परिणामी जनतेनेही भरघोस मतदान त्यांच्या बाजूने केल्याचे दिसून आले आहे. त्यातील नेमकी कारणे काय हे जाणून घेऊया.

आता भाजपच्या या मोठ्या विजयामागे अनेक कारणे आहेत, पण एक निर्णय असा आहे की जो गेम चेंजर मानला जात आहे. हा निर्णयही दिल्लीतील मतदानाच्या अवघ्या १०० तास आधी घेण्यात आला होता. एकीकडे दिल्लीत निवडणुका होत होत्या, तर दुसरीकडे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर केला होता. २०१४ नंतर सर्वात मोठी घोषणा यावेळी या अर्थसंकल्पात करण्यात आल्या. त्यातील १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर जाहीर केलेलं नाही. आता या निर्णयाने सगळी समीकरणेच बदलून गेली आहेत, एक्झिट पोलनेही हे दाखवून दिले आहे, असा विश्वास सर्व तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.किंबहुना दिल्लीत मध्यमवर्गीय मतदारांनी भाजपच्या बाजूने लाट निर्माण केली. ज्या मध्यमवर्गाला कोणत्याही पक्षाकडून काहीच मिळत नव्हते, तिथे आम आदमी पक्षापासून ते काँग्रेसपर्यंत ते केवळ मागासलेल्या समाज, मुस्लिम आणि इतर जातींवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करत होते, हा मध्यमवर्ग कोणालाच दिसत नव्हता. मात्र यावेळी भाजपने या मध्यमवर्गाला लक्ष्य केले आहे. परिणामी, दिल्लीत भाजपच्या बाजूने जे वातावरण निर्माण झाले आहे त्यात मध्यमवर्गाचा महत्त्वाचा वाटा असल्याची साक्ष आकडेवारी देत आहेत.संपूर्ण देशाबद्दल बोलायचे झाले तर दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत दिल्ली तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यात फक्त तेलंगणा आणि हरियाणा पुढे आहेत. दिल्लीत प्रति व्यक्ति दरडोई उत्पन्न १६७.५ टक्के आहे. दिल्लीच्या आर्थिक सर्वेक्षणातही असे सांगण्यात आले होते की सध्या राजधानीत दरडोई उत्पन्न प्रति व्यक्ति ४.६१ लाख आहे. एक आकडा असेही दर्शवितो की दिल्लीत मध्यमवर्गीय लोकसंख्या सुमारे ४५टक्के आहे, ही राष्ट्रीय सरासरीपेक्षाही जास्त आहे जी सध्या ३१% आहे.



## विदर्भ कन्या शाहिन पटेल होणार विदर्भभुषण पुरस्काराने सन्मानित

**जालना । असलम कुरेशी**

लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथील समाजसेविका विदर्भ कन्या शाहिन पटेल यांची वैदर्भिय नाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा विदर्भभुषण पुरस्कारासाठी निवड झाली आहे.




शाहिन पटेल यांना प्राप्त निवड पत्रात म्हटले आहे की उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन आपली निवड वैदर्भिय नाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या सामाजिक विभागाच्या वतीने विदर्भ भुषण पुरस्काराकरीता केलेली आहे. वैदर्भिय नाथ चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा स्थानिक महेश भवन कारंजा (लाड) जि. वाशिम येथे २३ फेब्रुवारी २०२५ रोजी कारंजा (लाड) येथे सकाळी ११:३० वाजता मंत्री महोदय तथा आमदार यांच्या उपस्थितीत आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये शाहिन पटेल यांना आकर्षक सन्मानचिन्ह, मेडल, दुपट्टा, सन्मानपत्र, मानाचा फेटा व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. शाहिन पटेल यांना विदर्भ भुषण पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल त्यांच्यावर विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## काँग्रेसचे नेते माजी आमदार सुभाष झांबड यांना पोलिस कोठडी

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

अजिंठा अर्बन को. ऑप. बँक मर्यादित घोटाळ्यात बँकेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे माजी आमदार सुभाष मानकचंद झांबड (वय ६३), राहणार कामगार चौक जवळ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांना अटक करण्यात आली. न्यायालयात हजर केले असता त्यांना १२फेब्रुवारी २०२५ पर्यंत पोलिस कस्टडी रिमांड मिळालेला असून गुन्ह्याचा अधिक तपास गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संभाजी पवार हे तपास करीत आहेत.



काय आहे बँक घोटाळ्याचे प्रकरण

सिटीचौक पोलिस ठाण्यात गुरन. ३५४/२०२३ कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, (अ), ३४, १२० (ब) भादवी सह व १४ चझखऊअंतर्गत गुन्हा दाखल आहे. सुभाष झांबड यांना १२ फेब्रुवारी पर्यंत पोलिस कस्टडी. छत्रपतीसंभाजीनगर (औरंगाबाद) अजिंठा अर्बन को. ऑप. बँक मर्यादित घोटाळ्यात बँकेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे माजी आमदार सुभाष मानकचंद झांबड (वय ६३), राहणार कामगार चौक जवळ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांना अटक करण्यात आली. न्यायालयात हजर केले असता त्यांना १२फेब्रुवारी २०२५ पर्यंत पोलिस कस्टडी रिमांड मिळालेला असून फेब्रुवारी २०२५ पर्यंत पोलिस कस्टडी रिमांड मिळालेला असून गुन्ह्याचा अधिक तपास गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संभाजी पवार हे तपास करीत आहेत. काय आहे बँक घोटाळ्याचे प्रकरण.

सिटीचौक पोलिस ठाण्यात गुरन. ३५४/२०२३ कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, (अ), ३४, १२० (ब) भादवी सह कलम ३ व ४ चझखऊअंतर्गत गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात चेअरमन, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी व कर्मचारी, सनदी लेखापाल यांनी आपसात संगणमत करुन दिनांक ०१/०३/२००६ते ३०/८/२०२३ या कालावधीत बनावट ३६ एफडी अगेनेस्ट लोन प्रकरणे तयार करून विनातारण असुरक्षित कर्ज वितरण करुन बँकेच्या लेजर बुकमध्ये व बनावट नोंद घेऊन तसेच दिनांक ३१/०१/२०२३ रोजीला एस.बी.आय.बँक, ॲक्सीस बँक आणि एम.एस.सी. बँक औरंगाबाद या बँकेच्या खात्यात त्यांचे जमा असलेल्या रकमेपेक्षा जास्तीच्या रकमेचे खोटे व बनावट बँक बॅलन्स प्रमाणपत्र तयार करून तसेच खोटा हिशोब दाखवून ताळेबंद तयार करून बँकेचे सुमारे ९१.४१ कोटी रुपये रकमेचा अपहार करुन आर्थिक फसवणूक केली आहे या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा पोलिस आयुक्त प्रविण पवार, पोलिस उपायुक्त नितिन बगाटे, पोलिस उपायुक्त (गुन्हे शाखा) प्रशांत स्वामी, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) सुभाष भुजंग यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संभाजी पवार करत आहे.

## मा.आमदार ज्ञानराज चौगुले यांनी केला नूतन उपनगराध्यक्ष अमिन सुबेकर यांचा सत्कार



**जळकोट । सचिन कदम**

लोहारा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी शिवसेना नगरसेवक आमिन सुबेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे तसेच नूतन उपनगराध्यक्ष अमिन सुबेकर दि.७ फेब्रुवारी २०२५ उमरगा शिवसेना संपर्क कार्यालयात शिवसेना उपनेते व माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांची भेट घेतली यावेळी माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी नेतून उपनगराध्यक्ष अमिन सुबेकर यांचा सत्कार करून शुभेच्छा व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सूर्यवंशी,शिवसेना लोहारा तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील,माजी गटनेते अभिमान खराडे, नगरसेवक अविनाश माळी, नगरसेवक आरिफ खानापुरे, पंचायत समिती माजी दीपक रोडगे, नगरसेवक विजयकुमार ढगे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## हत्तीरोग सामुदायिक औषध उपचार मोहीमचे घुंगराळा येथे जिल्हास्तरीय उदघाट्न

**नायगाव । प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम दि. १० फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान नांदेड जिल्यातील दहा तालुक्यात नायगाव, बिलोली, देगलूर, मुखेड, कंधार,भोकर, हदगांव, हिमायतनगर, किनवट व माहूर या तालुक्यात राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने मोहीमचे जिल्हास्तरीय उदघाट्न घुंगराळा ता. नायगाव येथील जिल्हा परिषद शाळा येथे दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ मान्यवरांच्या उपस्थित डी.ई.सी व अलबेडाँझोल गोळ्या सेवन करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमसाठी अध्यक्ष मा.रविंद्रजी चव्हाण साहेब खासदार नांदेड लोकसभा, उदघाट्क मा.आ.राजेश पवार साहेब नायगाव विधानसभा, प्रमुख पाहुणे मा. राहुल कर्डीले जिल्हाधिकारी नांदेड, मा. मिनल करणवाल मॅडम मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड, मा डॉ अर्चना भोसले – किर्दक मॅडम उपसंचालक आरोग्य सेवा लातूर, मा.डॉ. वैशाली तांभाळे मॅडम सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) लातूर, मा डॉ संगीता देशमुख जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड, मा.डॉ. निळकंठ भोसीकर जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे आयोजक डॉ राजेश्वर माचेवार जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी नांदेड, डॉ श्रीकांत पटवेकर, जिल्हा स्तरीय पर्यवेक्षक संजय भोसले, सत्यजीत टिप्रेसवार, व्यकटेश पुलकंठवार, हत्तीरोग कर्मचारी मनोहर खानसोळे, नागनाथ राऊलवार, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय नायगाव येथील अंकुश खिलारे, शैलेश मच्छरलावार, भास्कर ढेरे यांनी आज शाळेची पाहणी, नियोजन बदल मार्गदर्शन केले.

## विश्वकप विजेत्या भारतीय संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे यांचा भव्य सत्कार

**केज । प्रतिनिधी**

खो-खो महिला विश्वकपे विजेत्या भारतीयसंघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे चे केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कूल,केज येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

याबाबत सविस्तर माहीती अशी की,केज परिसरा तील कळमआंबा येथील कु.प्रियंका इंगळे हिच्या नेतृत्वाखालीलमहिलांच्या भारतीय खो-खो संघाने, दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर पारपडलेल्या विश्वकप स्पर्धेत अंतिम सामन्यात नेपाळ संघावर मात करत विश्वकप जिंकला.त्यामुळे या आपल्या भागातील कळमआंबा येथील प्रियंका इंगळे या लेकीचा स्वराज्य संस्था



संचलित चाईल्ड प्रायमरी स्कूल केज व ग्रामस्थांच्या वतीने दि.०८ फेब्रुवारी २०२५ रोजी शनिवारी सकाळी १०-०० वाजता भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.हनुमंत सौदागर हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नागेशजी कराळे, प्रियांकाचे आई वडिल आजोबा व काका,तसेच पत्रकार रंजीत घाडगे, शेखर पाटील,प्रकाश काळे,सचिन बचुटे,प्रदिप गायकवाड,गणेश तपसे, हरिश्चंद्र पांचाळ,शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष श्री.शरदजी गिराम सर यांनी केले होते.सत्काराचे स्वरुप पुष्पहार,पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ व ट्रॉफी मिळालेली प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे सर्व कर्मचारी,पत्रकार,ग्रामस्थ व इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रकाश काळे यांनी केले तर आभार शरद गिराम यांनी व्यक्त केले.

## शेतकऱ्यांच्या बाबतीत घोषणा फक्त नको आता अंमलबजावणी करा–खा.रजनीताई पाटील

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील राज्य सरकार व केंद्र सरकार केवळ आम्ही शेतकऱ्यां च्या बाजूने कसे आहोत हे दाखवण्याचा देखावा हे सरकार करत असून शेतकऱ्यांना फक्त घोषणा दिल्या जात आहेत असे परखड मत काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत व्यक्त केले.आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या बाबतीत अतिशयविदारक चित्र पहायलामिळत आहे सोयाबीनला प्रति क्विंटल ६ ते ७ हजार रुपये भाव देऊ म्हणून निवडणुकीत मत घेणारे हे सरकारआज ३हजार ८०० ते ४ हजारा ने सोयाबीन विकत जात असताना सरकार काय करत आहे हमीभाव कशाला बांधला ? असे सवाल त्यांनी केले तसेच १ रुपया मध्ये पीक विमा आणला ही चांगली गोष्ट मात्र तो



विमाच दिलाजात नाही उलट महाराष्ट्रात ५०० कोटींचा घोटाळा या विम्यात झालाय हे भाजप चे एक आमदारच सांगत आहेत मग ही योजना सरकार मधल्या लोकांसाठी आणली गेली का ? असाही प्रश्न पडतो. महा डीबीटी सारख्या पोर्टलवरकेवळयोजनांच्या नोंदणीचा फार्स केला जातोय याचा प्रत्यक्षात लाभ किती आणि कधी मिळणार असे एक ना अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या बाबतीत अनुत्तरित असल्याचे खा.रजनीताई पाटील म्हणाल्या.तसेच सरकार कृषी क्षेत्रात आर्टिफीशीयलइंटेलिजन्स (ए आय)चावापर करणार अशा घोषणा करणे म्हणजे एक फॅशनच झाली असल्याची टीका त्यांनी सरकारवर केली. शेतकऱ्यांच्या अशाविविध प्रश्नांवर खा.रजनीताई पाटील यांनी आवाज उठवत सरकारला चांगलेच धारेवर धरले व शेतकऱ्यांच्या मुख्य प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली त्यामुळे आता सरकार याची दखलघेऊन यामध्ये काय सुधारणा करणार हे महत्वाचे आहे.

## एन एम एम एस परीक्षेत रामराव पाटील शाळेचे घवघवीत यश

**केज । प्रतिनिधी**

केज येथील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थी (एन. एम. एम. एस) या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. शाळेकडून उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. गोरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर , केंद्रप्रमुख श्री अंकुशे उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थी व पालकांचा संयुक्त सत्कार करण्यात आला. रामराव पाटील माध्यमिक शाळेमध्ये दरवर्षी एन एम एस परीक्षेमध्ये विद्यार्थी प्रविष्ट केले जातात. यावर्षी ३० विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १५ विद्यार्थी एन. एम. एम. एस. परीक्षा उत्तीर्ण



झाले आहेत. यानिमित्त उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व त्यासोबत त्यांच्या पालकांचा सत्कार शाळेमध्ये आयोजित केलेला होता. यावेळी बोलताना डॉ सौदागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व ग्रामीण भागातील विद्यार्थी असे यश संपादन करू शकतात यासाठी पालकांनी शाळेसोबत एकत्र येऊन दिशादर्शन करावे असे सुचवले. तसेच पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री गोरे यांनी विद्यार्थ्यांना अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी सर्व पालक व विद्यार्थी उपस्थित होते यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे अध्यापक सतीश कळेकर ,शेख इर्शाद, श्री देवकते ,श्री पोटभरे यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती डॉ. गिरी यांनी केले तर आभार सुधीर नाईकनवरे यांनी केले. कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी पालक, सर्वशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय..

# महाकुंभाचे महाभारत



प्रयागराज येथे सुरू झालेला कुंभमेळा म्हणजेच महाकुंभ आजवरचा जगातला सर्वांत मोठा धार्मिक, सांस्कृतिक उत्सव होणार आहे. आज मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर निदान एक कोटी भाविक अमृत स्नान करतील, अशी अपेक्षा आहे. सोमवारीच स्नान केलेल्या भाविकांची संख्या साठ लाखांच्या वर गेली होती. हा संपूर्ण सोहळा आता सलग ४५ दिवस म्हणजे २८ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या काळात तीन दिवस विशेष पवित्र म्हणजे अमृत स्नानाचे आहेत.

अनेक आखाड्यांच्या शाही मिरवणुका आणि त्यांचा मान यांच्यामुळे या स्नानांना ‘शाही स्नान’ असे म्हणण्याची प्रथा पडली आहे. यंदा उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व आयोजन जास्तीत जास्त सुरळीत व्हावे, यासाठी कंबर कसली आहे. गेली तीन वर्षे या उत्सवाची तयारी विविध पातळीवर चालू आहे. यंदाचा महाकुंभ सुफळ संपूर्ण होईल, तोवर प्रयागराजमध्ये येणाऱ्या एकूण भाविकांची संख्या ४० कोटींच्या घरात जाऊ शकते. हा आकडा कल्पनेच्या पलीकडे मोठा आहे. जवळपास १८३ देशांमधील भाविकांनी कुंभमेळ्याची वेबसाइट पाहून यात सहभागी होण्याचा विचार चालविला आहे. विविध देशांमधील हजारो भारतीय, तसेच अभारतीय या आधीच भारतात आले असून हा आकडा महिन्याभरात काही लाखांपर्यंत जाईल.

इतके भाविक येणार असल्याने असंख्य प्रकारच्या यंत्रणा व व्यवस्था उभ्या कराव्या लागल्या आहेत. उत्तर प्रदेश सरकार काही हजार कोटी या महाकुंभाच्या आयोजनासाठी खर्च करीत आहे. शिवाय, केंद्र सरकारने विशेष अनुदान दिले आहे. महाकुंभ ही जशी धार्मिक आघाडीवरची महाघटना आहे; तशीच ती आर्थिक आघाडीवरची महाघडामोड होणार, हेही स्पष्ट आहे. काही तज्ज्ञ आणि संस्थांच्या मते या काळात किमान दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल, असा अंदाज आहे. ही मोठी उलाढाल अर्थकारणाला, तसेच रोजगार निर्मितीला चालना देणारी आहे. महाकुंभाच्या निमित्ताने याआधीच कित्येक हजार रोजगार निर्माण झाले आहेत. हा आकडा वाढणार आहे. देशात धार्मिक उत्सवांमध्ये होणारी चेंगराचेंगरी आणि भाविकांचे बळी यांचा इतिहासच आहे. सन १९५४ मध्ये कुंभमेळ्यात आठशे भाविकांचा प्राण गेला होता. त्यानंतरही अशा घटना घडत आल्या आहेत. यंदा हे टळावे म्हणून कृत्रिम प्रज्ञेची म्हणजे एआयची तर मदत घेण्यात आली आहेच; पण योगी सरकारने सप्त-स्तरीय संरक्षण यंत्रणा उभारली आहे. या बाबी यंदा कशा यशस्वी ठरतात, यावर पुढच्या धार्मिक आयोजनांना नवी दिशा मिळणार आहे.

कुंभमेळ्यांमधील अस्वच्छता, तेथे वृद्धांना सोडून देणे किंवा तिथे होणारे संघर्ष याबाबत टीका होत आली आहे. ती होणारच. मात्र, देशातील कोट्यवधी नागरिकांच्या ज्या श्रद्धा आहेत; त्यांची अवहेलना न करता त्यांचा सन्मान करूनच नव्या वाटा शोधायला हव्यात. कुंभमेळ्यांमध्ये येणारे सगळे साधू भोंदू किंवा नुसतेच भस्मचर्चित नाहीत. जीवनाचा व विश्वाचा आपापल्या परीने अर्थ शोधणारे उच्चशिक्षित मुमूक्षूही असतात. नागा किंवा इतरही साधूंमध्ये कित्येक उच्चशिक्षित तरुण-तरुणी आहेत. त्यात मुंबई आयआयटीसहित अनेक संस्थांमध्ये शिकलेले विद्याविभूषित आहेत. यातल्या चिदानंद सरस्वती या साधूंनी तर ‘मेरी थाली, मेरा थैला, कुंभ नही होगा मैला...’ असा प्रण केला आहे. प्लास्टिक बाटल्यांच्या क्रशरपासून प्रत्येक भाविकापर्यंत स्टीलची थाळी, पेला व पिशवी पोहोचविण्यासाठी चिदानंद सरस्वती धडपडत आहेत. ही संकल्पना राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही स्वीकारली असून आजवर देशभरातून काही लाख थाळ्या आणि कापडी पिशव्या जमा केल्या आहेत. त्या आता प्रयागराजमध्ये वाटल्या जात आहेत. हृषीकेशच्या परमार्थ निकेतन आश्रमाचे प्रमुख असणाऱ्या चिदानंद सरस्वती यांच्या अंदाजानुसार यंदाच्या कुंभमेळ्यात एकूण ५० लाख टन कचरा निर्माण होण्याची शक्यता आहे. यातला दहा ते वीस टक्के कचरा कमी झाला तसेच त्याच्यावर प्रक्रिया झाली, तर ते मोठेच यश ठरेल. ‘गंदगी और बंदगी साथ साथ नहीं जा सकते’ हा संस्कार सगळ्या श्रद्धावान भाविकांपर्यंत न्यायचा आहे, असे चिदानंद सरस्वती म्हणतात, ते योग्य आहे. गीतेत भगवान श्रीकृष्णांनी ‘श्रद्धावान् लभते ज्ञानं तत्पर: संयतेन्द्रिय:’ असे म्हटले आहे. श्रद्धावान, तत्पर आणि इंद्रियांवर संयम ठेवणाऱ्याला जर आत्मज्ञानही शक्य असेल तर त्याला सृष्टीच्या निरंतरतेचे भौतिक ज्ञानही का होऊ नये? महाकुंभाच्या महाभारतात अशा दोन्ही ज्ञानांच्या दिशा उजळून निघोत!

# बनवाट औषधांमुळे उपचार रामभरोसे

देवाचा प्रसाद ग्रहण करत असताना अगदी भक्तीभावाने घेतला जातो. तसेच डोळे बंद करून विश्वासाने गोळ्या औषधेही खाण्यात येतात. देवाच्या प्रसादावर जेवढा विश्वास ठेवण्यात येतो, तेवढाच विश्वास डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्यांवर ठेवला जातो; परंतु जर गोळ्या-औषधच बनावट असतील, तर किंवा त्यामुळेच जीवाला धोका आहे, असे समजल्यावर त्या माणसांची काय अवस्था होईल? याचा नुसता विचार जरी केला तरी जिवाचा थरकाप उडतो. मराठवाड्यातील बीड, नांदेड, धाराशिव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे उघडकीस आले आहे. मराठवाड्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधी व गोळ्यांचा पुरवठा करून रुग्णांसाठी त्याचा वापरही झाल्याचे उघडकीस आले आहे. नांदेडच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातून मे २०२३ मध्ये न्यूक्लास ६२५ या गोळ्यांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्या गोळ्यांचा अहवाल ऑक्टोबर २०२४ मध्ये प्राप्त झाला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने १ लाख २३ हजार गोळ्यांचा साठा जप्त केला. दीड महिन्यापेक्षा अधिकचा काळ उलटूनही संबंधित कंपनीविरुद्ध कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. विशेष म्हणजे ज्या कंपनीने हा पुरवठा केला होता ती कंपनीच मुळात अस्तित्वात नाही, असे सुरुवातीच्या तपासात आढळून आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुरवठादार व जिल्हा शासकीय रुग्णालयाची यामध्ये मिलीभगत असल्याचे बोलले जात आहे. धाराशिव जिल्ह्यातही औषध निर्मात्या कंपन्यांकडून आवश्यक गुणवत्ता नसणाऱ्या सहा प्रकारच्या गोळ्यांचा पुरवठा करण्यात आला होता. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार तीन टप्प्यात जवळपास पावणेतीन लाख गोळ्या त्या कंपनीने परत बोलावून घेतल्या. औषध पुरवठा करणाऱ्या त्या एजन्सीला धाराशिवमध्ये काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत. धाराशिव जिल्ह्यात आलेल्या सिप्रो-२५० एमजीच्या १ लाख ९ हजार २४०, सेफिक्सिम १ लाख १ हजार ३६२, सिप्रोफ्लोक्सासिन-५०० च्या ४० हजार २५८, एजिथ्रोमाइसिन १० हजार ८६४, अमॉक्सिसिलिन-३७५ च्या १९ हजार ६३०, अमॉक्सिसिलिन-६२५ च्या ७ हजार २४० अशा एकूण २ लाख ८८ हजारांहून अधिक गोळ्यांमध्ये आवश्यक गुणवत्ता नसल्याने संबंधित कंपनीला परत केल्या आहेत. यापैकी काही गोळ्या संबंधित कंपन्यांनी बदलून दिल्याचे समजते.छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयातही २३ प्रकारच्या औषधी संशयाच्या भोवऱ्यात आहेत. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या आदेशानुसार त्या ३३ प्रकारच्या औषधींचा वापर थांबविण्यात आला. शिवाय यातील २६ प्रकारची औषधी संपलेली असल्याने ज्या औषधींचा वापर थांबविला आहे. त्याऐवजी पर्यायी औषधी रुग्णांना दिली जात असल्याचे घाटी येथील अधिष्ठाता यांनी सांगितले. मराठवाड्यातील बीड जिल्हा तसा नेहमीच चर्चेत असतो. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयास बनावट औषधांचा पुरवठा करणारी एक टोळी उघडकीस आली आहे. मराठवाड्यात सर्वप्रथम या ठिकाणी बनावट गोळ्यांच्या पुरवठा झाल्याचे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणात असलेल्या टोळ्याच समोर आल्या आहेत. अंबाजोगाई येथील रुग्णालयात ॲझिमॅसीन-५०० या औषधांचे सॅम्पल नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. त्यांची तपासणी होऊन २३ ऑक्टोबर २०२४ रोजी आलेल्या अहवालात सदरील औषध हे रुग्णांसाठी निष्क्रिय व बनावट असल्याचे उघडकीस आले. या गोळ्यांमध्ये ॲजिथ्रोमायसीन हा घटक असणे अत्यंत आवश्यक होते; परंतु सदरील गोळ्यांमध्ये ॲजिथ्रोमायसीन नसल्यामुळे हा बनावट गोळ्यांचा प्रकार उघडकीस आला. किमान साडेआठ हजार रुग्णांच्या पोटात या गोळ्या गेल्या. यामधून जीवित हानी झाली नाही, असे सांगितले जात असले तरी या प्रकरणाच्या खोलाशी गेल्यास यामधून काहीतरी वेगळेच बाहेर येईल, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. याप्रकरणी सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी जि. ठाणे), द्विती सुमित त्रिवेदी, (सुरत) व विजय शैलेंद्र चौधरी रा. मीरा रोड, ठाणे या चौघा जणांविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्या औषधीच्या तक्रारीनंतर सव्वा वर्षाने अहवाल प्राप्त झाला व त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. म्हणजेच या दरम्यान हजारो रुग्णांच्या पोटात त्या गोळ्या गेल्या. त्या बनावट गोळ्या रुग्णांसाठी किती घातक ठरल्या हे आता शोधण्याची गरज आहे.मराठवाड्यात ज्या कंपनीने गोळ्या पुरवठा केल्यात त्यापैकी उत्तराखंडमधील ब्रिस्टल फार्मा, केरळमधील रिफंड फार्मा, बायोटेक फॉर्म्युलेशन व मेलबर्न बायो सायन्स तसेच एस एम एन लॅब या पाच कंपन्या बनावट असल्याचे समोर आले आहे. या कंपन्यांनी प्रत्येक ठिकाणी बनावट औषधांचा पुरवठा केला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या कंपन्यांची औषधे असल्यास त्याबाबत त्वरित कळविण्यात यावे, असे पत्र संचालक कार्यालयातर्फे मराठवाड्यातील जिल्हा रुग्णालयांना पाठविण्यात आले आहेत. पूर्वी एक म्हण खूप प्रसिद्ध होती. शहाण्या माणसाने कोर्टाची व पोलीस स्थानकाची पायरी चढू नये, असे म्हटले जायचे; परंतु आता त्यामध्ये आणखी एक भर पडली आहे. शहाण्याला कधीही दवाखान्यात जाण्याची वेळ येऊ नये, असेच मराठवाड्यातील अनेक प्रकरणांवरून म्हणता येईल. आरोग्य यंत्रणेतील पुरवठादार तसेच ठेकेदार यंत्रणा रुग्णांच्या जीवावर उठली आहे. बनावट औषधांचा पुरवठा करून या लोकांनी काय साध्य केले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अन्न व औषधी प्रशासनाचा कारभारही रुग्णांसाठी जीवघेणाच ठरत आहे. तपासणीसाठी पाठविलेल्या गोळ्यांबाबतचा अहवाल सव्वा वर्षाने प्राप्त झाला आणि त्यानंतर गुन्ह्याची नोंद होते, म्हणजे आरोग्य यंत्रणा तसेच अन्न व औषध प्रशासन हे दोघेही चक्क झोपेत आहेत की काय? असेच म्हणण्याची वेळ अंबाजोगाई येथील बनावट गोळ्या प्रकरणानंतर सर्वांच्या लक्षात येत आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात औषधी गोळ्यांचा वेगळाच काळाबाजार चालतो. या ठिकाणी दाखल असलेल्या रुग्णाला अनेकदा बाहेरून औषध-गोळ्या विकत आणाव्या लागतात.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, धाराशिव, जालना, परभणी, हिंगोली यासह लातूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात सर्वत्र अलबेल कारभार आहे. रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, औषधोपचार व कर्मचारी व डॉक्टरांची वागणूक यावरून अनेकदा बाचाबाची होते, तसेच त्याचे पर्यवसान भांडणात झाल्याचे पाहावयास मिळते. रुग्णांचे वागणे प्रशासनाला कदाचित वाईट वाटणारे असेल; परंतु त्याच रुग्णांना दिले जाणारे बनावट औषध जीवघेणे ठरत आहेत. अशा परिस्थितीत दोष रुग्णांचा की आर्थिक फायद्यासाठी बनावट औषधी विक्रेते करणाऱ्या कंपन्यांचा व प्रशासनाचा? हा विचार कुठेतरी गांभीर्याने होणे गरजेचे आहे. मराठवाड्यात बोगस व बनावट औषधींच्या पुरवठ्यावरून पुन्हा एकदा रुग्णालयांची तसेच औषधांची खातरजमा करून त्यात दोषींविरुद्ध कडक शिक्षेची अंमलबजावणी व तरतूद आवश्यक आहे. नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात कुत्रा चावल्यानंतर आलेल्या रुग्णांना देण्यासाठी इंजेक्शनच उपलब्ध नसल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

जीव मुठीत घेऊन उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णाला बाहेरच्या खासगी मेडिकलमधून इंजेक्शन विकत आणावे लागत आहे. हा प्रकार नित्याचाच झाला आहे. असाच एक प्रकार निवडणूक प्रचारादरम्यान घडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी नांदेडमध्ये असताना दुपारी तीन वाजता एका ४० वर्षीय महिलेला सभेसाठी जाताना रस्त्यावरील कुत्र्याने चावा घेतला. त्यानंतर त्या महिलेने नांदेडच्या श्यामनगर येथील महिला रुग्णालयात धाव घेतली. त्या ठिकाणी कुत्रा चावल्यानंतर दिले जाणारे इंजेक्शन उपलब्ध नाही, असे रुग्णाला सांगितले . त्यांना शिवाजी पुतळा येथील सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले . त्या ठिकाणी गेल्यावर त्या महिलेला सांगण्यात आले की, या जखमेवर लागणारे तीन पैकी केवळ दोनच इंजेक्शन येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे तुम्ही येथून आठ किलोमीटर दूर असलेल्या विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात जा. सदरील महिला विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे गेल्यानंतर उपचार करत असलेल्या डॉक्टरांनी सांगितले की, तुम्हाला द्यायचे असलेले इंजेक्शन आमच्या शासकीय रुग्णालयात उपलब्ध नाही. तुम्ही ते बाहेरच्या खासगी मेडिकलमधून विकत आणा. ते इंजेक्शन रुग्णाला विकत आणावे लागले. त्यासाठी रुग्णाला ४६०० रुपयांचा खर्च आला. हा प्रकार आजही सुरूच आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयात दररोज श्वान दंशाचे किमान २५-३० रुग्ण येतात. एकंदरीत पाहिले तर मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात असलेल्या शासकीय रुग्णालयात होत असलेल्या औषधींच्या पुरवठ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.बनावट औषधी असो की श्वानदंश असो, एखाद्याचा जीव गेल्यावर आरोग्य यंत्रणा जागी होणार आहे की काय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. औषध गोळ्या तसेच उपचाराच्या बाबतीतही सर्वत्र अलबेल आहे. मराठवाड्यातील शासकीय रुग्णालये तसेच उपचार रामभरोसेच आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. मड्याच्या टाळूवरचे लोणी खाणे ज्याप्रमाणे भ्रष्टाचारी , बेशरम लोकांना आवडते त्याचप्रमाणे शासकीय रुग्णालयात बनावट गोळ्या व औषधांचा पुरवठा करून त्या माध्यमातून आर्थिक कमाई करून घेणाऱ्या कंपन्या व त्याचे चालक उथळ माथ्याने फिरत आहेत. अशा भ्रष्टाचारी व जीवघेण्या कंपनी चालकांविरुद्ध कठोर शिक्षा होणे अत्यंत गरजेचे आहे.

# अठराव्या वर्षातील विश्वविजेता




भारताचा डोम्माराजू गुकेश नवा बुद्धिबळ जगज्जेता ठरला. सिंगापूर येथे गुरुवारी फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत १४व्या आणि अंतिम डावात गतविजेता चीनच्या डिंग लिरेनला चेकमेट देत त्याने जेतेपदाला गवसणी घातली. त्यानंतर संपूर्ण भारतात अनोख्या जल्लोषाला सुरुवात झाली. स्पर्धेच्या १३८ वर्षांच्या इतिहासात १८ वर्षीय गुकेश हा जगातील सर्वात तरुण विजेता ठरला. याबाबत त्याने माजी विजेते, महान खेळाडू रशियाचे गॅरी कास्पारोव्ह यांना मागे टाकले. आपले महान खेळाडू आणि माजी विश्वविजेता विश्वनाथन आनंद यांच्यानंतर वर्ल्ड चॅम्पियन बनलेला गुकेश हा भारताचा केवळ दुसरा बुद्धिबळपटू आहे. गुकेश हा पाच वेळा विश्वविजेता आनंद यांचा शिष्य आहे. आनंद यांच्या वेस्टब्रिज आनंद बुद्धिबळ ॲकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेतो. आनंद यांनी २०००मध्ये पहिल्यांदा भारतात जगज्जेतपदाची ट्रॉफी आणली. त्यानंतर २००७ ते २०१३ या कालावधीत चार असे एकूण विक्रमी वेळा जगज्जेतपदावर नाव कोरले. त्यानंतर तब्बल १३ वर्षांनी त्यांच्या शिष्याने ही अनोखी कामगिरी साकारली. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या इतिहासात विश्वविजेती ठरलेली आनंद-गुकेश ही जगभरातील पहिलीच जोडी आहे.

कुठल्याही खेळात जगज्जेतपद मिळवणे सोपे नसते. फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धाही त्याला अपवाद नाही. यंदा सिंगापूरमध्ये १७ दिवस रंगलेल्या जागतिक स्पर्धेत डिंग आणि गुकेश यांच्यात चुरशीची लढत झाली. गतविजेता लिरेन जेतपद राखण्यासाठी उत्सुक होता. या वर्षाच्या सुरुवातीला झालेली चॅलेंजर्स स्पर्धा जिंकून गुकेशने प्रबळ दावेदारी पेश केली. यंदाच्या स्पर्धेत १४ पैकी चार डाव निकाली ठरले, तर दहा डाव बरोबरीत (ड्रॉ) झाले. डिंग लिरेनने पहिला डाव ४२व्या चालीमध्ये जिंकताना आश्वासक सुरुवात केली. दुसऱ्या डावात पिछाडीवरून गुकेशने स्वतःला सावरले. हा डाव बरोबरीत सुटला. त्यानतंर गुकेशने तिसऱ्या डावात ३७व्या चालीमध्ये विजय मिळवून जबरदस्त पुनरागमन केले. तोडीसतोड खेळाचे प्रदर्शन झाल्याने चौथा ते दहा असे सलग सात डाव बरोबरीत सुटले. ११व्या डावात पांढऱ्या मोहऱ्यांनिशी खेळताना गुकेशने प्रतिस्पर्ध्याला कोंडीत पकडत २९व्या चालीमध्ये मात दिली. मात्र, पुढच्याच डावात डिंगने पलटवार करताना विजय मिळवला. १३व्या डावात दोघांनीही सावध पवित्रा घेतला. तेव्हा लिरेन आणि गुकेशच्या खात्यात प्रत्येकी ६.५ गुण होते. त्यामुळे १४व्या आणि अंतिम डावाकडे अवघ्या जगाचे लक्ष लागून राहिले होते. निर्णायक डावात गुकेशने काळ्या सोंगट्यांसह खेळूनही बाजी मारली. हा डाव बरोबरीकडे झुकणार असे वाटत होते; परंतु ५५व्या चालीत लिरेनने मोठी चूक केली. ज्याचा फायदा उठवत गुकेशने ७.५-६-५ अशा फरकाने पहिल्या-वहिल्या जगज्जेतपदावर शिक्कामोर्तब केले.

गुकेशच्या जागतिक यशात स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अपटन यांचा मोठा वाटा आहे. अपटन यांच्याच मार्गदर्शनाखाली भारताच्या क्रिकेट संघाने २०११ वनडे विश्वचषक आणि २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये हॉकीमध्ये कांस्यपदकाची कमाई केली होती. गुकेशसारख्या युवा खेळाडूला मदत करत पॅडी अपटन यांनी पुन्हा एकदा आपले वेगळेपण सिद्ध केले. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत खेळणे प्रत्येक बुद्धिबळपटूसाठी खडतर मानले जाते. अनेकदा हा सामना फक्त तुम्ही शिकलेल्या चालींचा नाही, तर मानसिकतेचाही होतो. मॅग्नस कार्लसनसारखा विख्यात बुद्धिबळपटूही आपली पहिली जागतिक अजिंक्यपद स्पर्धा खेळत असताना थोडासा विचलीत झाला होता. डिंग लिरेनला आव्हान देत असताना विजेतपदासाठीच्या लढतीत गुकेशला सुरुवातीलाच दोन धक्के बसले. पहिल्याच सामन्यात झालेला पराभव आणि त्यानंतरच्या सामन्यात विजय शक्य असतानाही झालेला पराभव गुकेशसाठी धक्कादायक होता; परंतु यानंतर गुकेशने जो खेळ केला तो निव्वळ अविश्वसनीय होता. तुम्हाला एखाद्या परीक्षेत चांगली कामगिरी करायची असेल तर संपूर्ण पुस्तकाचा तुम्हाला चांगल्या पद्धतीने अभ्यास करावा लागतो. तेव्हाच तुम्ही परीक्षेत आत्मविश्वासाने जाऊ शकता. केवळ आशेच्या जोरावर तुम्ही परीक्षा देऊ शकत नाही. स्पर्धेदरम्यान किती वेळ झोपायचे, पिछाडीवर किंवा दबावाखाली स्वतःला कसं सावरायचे तसेच प्रत्येक क्षणांचा कसा सामना करायचा याचा अभ्यास करून गुकेश अंतिम सामन्यात उतरला होता. त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात त्याने जगज्जेतपदावर नाव कोरले, हे अपटन यांनी गुकेशच्या मेहनतीबद्दल केलेले भाष्य खूप काही सांगून जाते. प्रत्येक खेळाडूने त्याप्रमाणे स्वतःला घडवायला हवे. मूळचा चेन्नईचा असलेल्या गुकेशचे आई-वडील उच्चशिक्षित आहेत. त्याची आई मायक्रोबायोलॉजिस्ट आणि वडील डॉक्टर आहेत. मात्र, गुकेशला त्याच्या आई-वडिलांच्या क्षेत्रापेक्षा बुद्धिबळमध्ये अधिक रूची होती. सातव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात करणाऱ्या गुकेशने केवळ ११ वर्षांच्या कालावधीत वर्ल्ड चॅम्पियन बनून भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. अत्यल्प काळात मिळवलेले यश त्याची मेहनत, एकाग्रता आणि बुद्धिमत्ता दर्शवते. जेतेपद पटकावल्यानंतर गुकेश भावुक झाला. त्याला आनंदाश्रू अनावर झाले. स्पर्धा संपल्यानंतर पत्रकार परिषदेत पुन्हा बुद्धिबळाचा पट जसा मांडतो तसा मांडला आणि त्याला नमस्कार केला. ही आपली संस्कृती आहे. परंपरा आहे. ती त्याने परदेशातही जपली. गुकेश हा जगज्जेतपदामुळे युवा पिढीसाठी एक प्रेरणास्त्रोत बनला आहे. आपल्याकडे अठरावं वरीस धोक्याचे मानले जाते. कारण मुले सज्ञान होतात. या वयात बिघडण्याचा धोका अधिक असतो. मात्र, अठरावे वर्ष हे विश्वविक्रमाचे असते, हे डोम्माराजू गुकेशने दाखवून दिले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते

# निबे डिफेन्स अ‍ॅण्ड एरोस्पेस लि.च्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल,लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचे उद्घाटन

## राज्याच्या संरक्षण उत्पादन धोरणामुळे देशाचे खरे डिफेन्स क्लस्टर हे महाराष्ट्र आणि पुण्यात-मुख्यमंत्री






**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हे पहिले असे राज्य आहे की ज्याने काळाची पावले ओळखून २०१७ साली संरक्षण उत्पादन धोरण तयार केले. आज देशाचे खरे डिफेन्स क्लस्टर हे महाराष्ट्र आणि त्यातही ते पुण्यात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया- मेक फॉर वर्ल्ड' ही घोषणा दिली आणि देशातील नवोन्मेषकांना संधी, व्यासपीठ मिळवून दिल्याने आज आपला देश संरक्षण क्षेत्रात श्रेष्ठत्वाकडे वाटचाल करत आहे, असेही ते म्हणाले.

चाकण औद्योगिक क्षेत्रांतर्गत नानेकरवाडी येथील निबे डिफेन्स ण्ड एरोस्पेस लि.च्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचे उद्घाटन आणि स्थापना दिन सोहळा तसेच कंपनीच्या शिर्डी सुविधेच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार महेश लांडगे, निबे लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, एल अँड टी डिफेन्सचे कार्यकारी उपाध्यक्ष अरुण रामचंदाणी उपस्थित होते.

आपल्या देशात नवोन्मेषकांची कधीच कमतरता नव्हती, मात्र त्यांना संधी, व्यासपीठ मिळत नव्हते, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री मोदी यांनी 'मेक इन इंडिया- मेक फॉर वर्ल्ड ही घोषणा केली. संरक्षण उत्पादन आणि तंत्रज्ञानाच्या बळावळ श्रेष्ठत्व असलेल्या अमेरिकेसह जगातील श्रीमंत देशांच्या श्रीमंतीच्या पाठीशी त्यांचे संरक्षण उत्पादन आहे. संरक्षण उत्पादनांच्या बाबतीत आपला देश दुर्दैवाने मागे राहिला. आपण अनेक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्या सुरू केल्या. त्यांनी निश्चितच चांगले काम केले. मात्र, यामध्ये जी अत्याधुनिकतेकडे, तंत्रज्ञानाधारित युद्धपद्धतीकडे (टेक्नॉलॉजिकल वॉरफेअर) वाटचाल होणे आवश्यक होते, ते झाले नाही. ते काम मोदी यांच्या काळात झाले. आगामी काळ हा टेक्नॉलॉजिकल वॉरफेअरचा असून या मध्ये भारताला श्रेष्ठत्व मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री मोदी यांनी, ज्या देशांकडून संरक्षण उत्पादने आयात करण्यात येतील त्यातील काही भाग त्यांनी भारतातच तयार करावेत अशी अट ठेवली. या अटीमुळे आयात होणाऱ्या संरक्षण उत्पादनांचे काही भाग आपल्या देशातच तयार व्हायला सुरुवात झाली. २०१६ साली माझगाव डॉक येथे एका पाणबुडीचे जलावतरण झाले होते ती १०० टक्के आयातीत भागांवर होती. मात्र नुकतेच प्रधानमंत्री यांच्या हस्ते जलावतरण झालेल्या पाणबुडीचे ६० टक्क्याहून अधिक भाग हे भारतात तयार करू शकलो आहोत. यापूर्वी या पाणबुडीसाठी चार पट अधिक खर्च करत होतो. यामुळे एक मोठी परिसंस्था (इकोसिस्टीम) आपल्या देशात तयार झाली आहे. यापूर्वी संपूर्ण संरक्षण उत्पादनांचे आयात करणारा आपला देश आज २५ हजार कोटी रुपयांची निर्यात करत आहे. आज मोठे काम या क्षेत्रात देशात होत आहे.महाराष्ट्राने २०१७ साली संरक्षण उत्पादन धोरण तयार करुन त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी अंतर्गत निधी (फंड ऑफ फंड) स्थापन केला. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील ३०० स्टार्टअप सुरू झाले. आज पुणे नागपूर आदी ठिकाणी संरक्षण उत्पादन होत आहे.

आपला देश यापूर्वी संरक्षण साधनांसाठी याचक होता; मात्र आज श्रेष्ठ असून अचूक पद्धतीने विविध संरक्षण उत्पादने तयार करीत आहे. शत्रूदेशावर अचूक मारा करण्याच्या दृष्टीने आज मार्गदर्शित क्षेपणास्त्राचा (गायडेड मिसाइल) जवळपास दोन हजार किलोमीटरची पल्ला गाठण्याकडे आपला प्रवास सुरू असून संरक्षण क्षेत्रात जगातील प्रगत देशांमध्ये आपला समावेश होत आहे. संरक्षण क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीचे श्रेय नीबेसारख्या लोकांना जाते, त्यांनी संशोधन केले, एल अँड टी सारख्या कंपनीने त्यांच्यावर विश्वास दाखविला, असेही ते म्हणाले.ज्याला नाविन्यता समजते आणि दूरदृष्टी असते तो व्यक्ती साधने नसली तरी तो यशस्वी होतो, असे सांगून श्री. फडणवीस यांनी एका मराठी तरुणाने एक स्वप्न पाहिले आणि कर्तृत्वाच्या जोरावर ते पूर्ण केले या शब्दात गणेश निबे यांचे अभिनंदन केले. याही वर्षी गतवर्षीपेक्षा मोठ्या स्वरूपातील डिफेन्स एक्स्पो करण्यात येईल अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.शासकीय कंपन्यांच्या बरोबरीने खाजगी क्षेत्रानेही देशाच्या संरक्षणसिद्धतेत योगदान द्यावे- अजित पवार

श्री. पवार म्हणाले, येणाऱ्या काळात होणारी युद्ध, जमिनीवर होतीलच, त्याचबरोबरीने आकाशात, पाण्यात, अंतराळात, इंटरनेट, मोबाईलच्या माध्यमातूनही होतील. त्यादृष्टीनेही आपली संरक्षणसिद्धता असण्याची गरज आहे. त्यासाठी शासकीय कंपन्यांच्या बरोबरीने खाजगी क्षेत्रानेही देशाच्या संरक्षणसिद्धतेत योगदान द्यावे, महत्वाची भूमिका बजावावी, असा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी नीबे कंपनीसारख्या संस्थांचे कार्य, मदत, भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.गणेश निबे यांच्या नेतृत्वाखाली २०२१ मध्ये स्थापन झालेल्या निबे लिमिटेडनं अवघ्या पाच वर्षात केलेला प्रवास निश्चितच कौतुकास्पद आणि अभिमानस्पद आहे. श्री. निबे यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातून पुढे येऊन काम करणाऱ्या तरुणाला मदत करण्याचा आनंद वेगळाच असतो. सतत काहीतरी नवीन करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन् इंडियाचं उद्दीष्ट समोर ठेवून, देशाला संरक्षणसिद्धतेकडे नेण्याच्या त्यांच्या प्रयत्नाबद्दल त्यांचे कौतुक करतो, असेही श्री. पवार म्हणाले.गेल्या काही वर्षात देशाच्या संरक्षणसामग्री निर्मिती उद्योगात अमूलाग्र बदल झाले. परदेशातून आयात होणारी संरक्षण सामग्री महाग असते. कधीकधी त्यांचा दर्जा कमी असतो. या सगळ्या संकटांवर मात करण्यासाठी, डीआरडीओ सारख्या शासकीय संस्थांच्या बरोबरीने संरक्षण सामग्री निर्मितीत खाजगी क्षेत्राचे सहकार्य घेण्यात येत आहे. दारुगोळा, लष्करासाठी आवश्यक पुलाचे यंत्र, अत्याधुनिक रायफल आदी अनेक शस्त्र स्वदेशात तयार होत असल्याने त्याचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचत आहे. देशाची संरक्षणसिद्धता वाढवताना, देशाला संरक्षणाच्या क्षेत्रात आत्मनिर्भर बनवताना, आयात कमी करुन,संरक्षण सामग्रीची निर्यात वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा, देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहाचवण्याचे प्रधानमंत्र्यांचे स्वप्न साकार करायचे आहे.गेल्या आर्थिक वर्षात देशानं ८५ हून अधिक देशात, २१०.८ अब्ज रुपयांची निर्यात केली. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात, संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेला (डिआरडीओ) २.९ अब्ज अमेरिकन डॉलर्स मिळाले. २०२८-२९ पर्यंत, ५०० अब्ज रुपये म्हणजे ६ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या वार्षिक संरक्षण निर्यातीचं लक्ष्य आहे.येणाऱ्या काळात, देशाचा अभिमान, स्वाभीमान असलेल्या, डीआरडीओ, इस्रो, माझगाव डॉक, भारत इलेक्ट्रॉनिक्स, भारत इलेक्ट्रिकल्स, भारत डायनॅमिक्स, कोल इंडिया, एचएएल, आयडीया फोर्ज, ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लॅबोरेटरी या कंपन्यांच्या यादीत 'निबे लिमिडेट' कंपनीचे, 'निबे' उद्योगसमुहाचे नावही ठळकपणे असेल यासाठी त्यांनी कंपनीला शुभेच्छा दिल्या.उद्योगमंत्री सामंत म्हणाले, गतवर्षी निबे यांनी पुणे येथे डिफेन्स एक्स्पो घेण्यात पुढाकार घेतला. त्याची नोंद जागतिक पातळीवर घेतली गेली. श्री. निबे यांच्यासारखा मराठी माणूस संरक्षण क्षेत्रामध्ये देशाचे नेतृत्व करतो आहे याचा मनापासून आनंद होत आहे. त्यांना राज्याच्या उद्योग विभागाकडून जे सहकार्य लागेल ते देण्याचे काम केले जाईल. महाराष्ट्राच्या उद्योग जगतातील असेट अशा शब्दात श्री. निबे यांचा त्यांनी गौरव केला.श्री. विखे पाटील म्हणाले, प्रधानमंत्री मोदी यांनी मेक इन इंडियाचा जो संकल्प आणला आहे. तो पुढे नेण्याचे काम श्री. निबे करत आहेत. शिर्डी येथे नवीन औद्योगिक क्षेत्रात संरक्षण क्लस्टर उभे राहत असून त्यात पहिला प्रकल्प निबे समूहाचा येत आहेत. संरक्षण क्लस्टर सुरू करण्यातील तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करू शकल्यास या प्रकल्पाचा चालना मिळेल, असेही ते यावेळी म्हणाले.प्रास्ताविकात श्री. निबे यांनी आपल्या कंपनीविषयी माहिती दिली. कंपनी संरक्षण क्षेत्र, अवकाश, सायबर आदी क्षेत्रात काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य तंत्रज्ञान अधिकारी बालकृष्णन स्वामी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे कंपनीच्या प्रवासाची माहिती दिली. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनीदेखील यावेळी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमात निबे डिफेन्स ण्ड एरोस्पेस लि.चे डिआरडीओशी तंत्रज्ञान आदानप्रदान करार, प्रिमीअर एक्स्प्लोजिव्हस, महाराष्ट्र सरकारचे एमआरसॅक, थॅलेस लेनिया स्पेस, ब्लॅक स्कय या कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले.यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अन्य मान्यवरांनी प्रकल्पाची पाहणी केली.यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी अनबलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, निबे लि. चे अकार्यकारी स्वतंत्र संचालक सुनील भोकरे, रंजना मिमानी, डॉ. दशरथ राम, वेंकटेश्वरा मन्नावा, भगवान गदादे यांच्यासह कंपनीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी सरकारचा मोठा निर्णय

# लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी 3 कोटींचा खर्च

**मुंबई (वृत्तसंस्था)**

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला राज्यात मिळालेल्या यशाचे श्रेय लाडकी बहीण योजनेला दिले जाते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहिणी योजनेच्या प्रसिद्धीसाठी तीन कोटी रुपयांच्या खर्चाला राज्य सरकारच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आता शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या योजनांना ब्रेक लावण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्य सरकारच्या लाकडी बहिण योजनेवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. मात्र या योजनेवर झालेल्या मोठ्या प्रमाणातील खर्चामुळे आता राज्य सरकार इतर काही योजना बंद करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यात शिव भोजन थाळी आणि आनंदाचा शिधा अशा योजनांचा समावेश आहे. त्यामुळे या योजनांना आता ब्रेक लागणार असल्याचे बोलले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना विधानसभा निवडणुकीच्या आधी जाहीर करण्यात आली होती. या योजनेला महिला वर्गातून मोठी लोकप्रियता मिळाली. त्यामुळेच महिला मतदारांनी महायुती सरकारला पुन्हा एकदा सत्तेवर बसवले, अशी चर्चा सुरू आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा पंधराशे रुपये दिले जातात. राज्य सरकारच्या वतीने विधानसभा निवडणुकीच्या आधी या माध्यमातून महिलांना पाच हप्ते तर निवडणुकीनंतर आतापर्यंत दोन हप्ते दिलेले आहेत. यात आतापर्यंत महिलांना दहा हजार पाचशे रुपये मिळाले आहेत. मात्र या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवरील ताण वाढला आहे.

# देणार नव्हता तर शेतकरी कर्जमाफीची घोषणा का केली?:विजय वडेट्टीवार यांचा संतप्त सवाल

**नागपूर (वृत्तसंस्था)**

सरकार शेतकरी कर्जमाफी देऊ शकत नाही, मग घोषणा का केली? असा प्रश्न काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारला आहे. जाहिराती देऊन सरकार पुन्हा दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. लाडकी बहिण योजनेच्या जाहिरातींच्या खर्चासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीवरुन वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त केला.




या माध्यमातमून राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. या संदर्भात विजय वडेट्टीवार म्हणाले की, या सरकारने अनिल अंबानी यांचे ४९ हजार कोटींचे कर्ज ५०० कोटी रुपये सेटलमेंट केले आहे. आतापर्यंत उद्योग क्षेत्रातील २९ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले आहे. मग शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी हाताला लखवा मारला का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कर्ज माफ केले जात आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठीच यांच्याकडे पैसे नाहीत का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार नसाल आणि त्यांची हाल करणार असाल तर शेतकरी तुम्हाला माफ करणार नाही. राज्यातील शेतकरी आज ना उद्या तुमच्या विरोधात उभे राहणार आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफीची घोषणा करूनही तुम्ही पैसे देत नाहीत. लोकसभा झाली, विधानसभा झाली मात्र जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये ईव्हीएममध्ये गडबड झाली नाही तर शेतकऱ्यांचा राग तुम्हाला नक्की दिसेल, असा इशारा देखील वडेट्टीवार यांनी दिला आहे.

# नवीन कामगार कायदे लागू करताना कामगार हिताची पूर्ण काळजी घेतली जाईल-मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

नवीन कामगार कायदे लागू करताना कामगार हिताची काळजी घेण्यात येईल तसेच भारतीय मजदूर संघाने घेतलेल्या हरकतींचा पूर्ण विचार केला जाईल, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज केले.

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने नवीन लेबर कोड आणि बी.एम.एस. या विषयावर आयोजित सेमिनार मध्ये ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲडव्होकेट अनिल ढुमणे, महामंत्री किरण मिलगिर, अखिल भारतीय उपाध्यक्ष राज बिहारी शर्मा, क्षेत्र संघटन मंत्री श्री राजेशजी, ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या संचालक श्रीमती रोशनी कदम - पाटील आणि प्राध्यापक पी.एम.कडूकर उपस्थित होते.

नवीन कामगार कायदे २०१९ - २०२० पासून संसदेने पास केलेले असून ते लागू करण्याबाबत केंद्र व राज्य सरकार विचार करीत आहे. या पार्श्वभूमीवर या कायद्यांबाबत भारतीय मजदूर संघाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी या सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

सेमिनारचे उद्घाटन कामगार मंत्री श्री.फुंडकर यांनी केले. ड.ढुमणे आणि श्री.शर्मा यांनी या कायद्यांबाबत भारतीय मजदूर संघाची भूमिका विशद केली. या निमित्ताने ड.ढुमणे यांनी लिहिलेल्या नवीन लेबर कोड आणि बी.एम.एस.' या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय श्रमशोध मंडळाच्या वतीने कामगारमंत्री श्री.फुंडकर हस्ते करण्यात आले.सामाजिक सुरक्षा कोड २०२० आणि वेतन कोड २०१९ हे कामगार कायदे असंघटित आणि संघटित क्षेत्रातील कामगारांच्या साठी लाभदायक असून घरेलू, बांधकाम, अंगणवाडी, आशा सेविका, फेरीवाले, रिक्षाचालक, टॅक्सीचालक आदी असंघटित क्षेत्रातील सुमारे ५० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि




संघटित आणि असंघटित क्षेत्रातील सर्व कामगारांना किमान वेतन हमी देणारे असल्याने ते तत्काळ लागू झाले पाहिजे, अशी मागणी याप्रसंगी करण्यात आली. त्याचबरोबर औद्योगिक संबंध कोड २०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती कोड २०२० या कोड मधील कारखाना बंद करणे, कामगार कपात, ले ऑफ, फिक्स टर्म एम्प्लॉयमेंट, स्टँडिंग ऑर्डर आणि कंत्राटी कामगारांशी संबंधित अनेक तरतुदी बदलून मगच ते कायदे लागू करावेत, अशी मागणी भारतीय मजदूर संघाच्यावतीने यावेळी करण्यात आली. या सेमिनारला राज्यभरातून संरक्षण, वीज मंडळ, बँका, विमा, अनुऊर्जा, पोस्ट , मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, ठउऋ , पोर्ट ट्रस्ट, खाजगी कारखाने, सार्वजनिक उद्योग, सहकारी बँका, शासकीय कर्मचारी, सिक्युरिटी प्रेस व करन्सी नोट प्रेस, कंत्राटी कामगार, अंगणवाडी, घरेलू , बांधकाम, रिक्षाचालक, फेरीवाले, टॅक्सीचालक, बिडी, मर्चंट नेव्ही, सुरक्षा रक्षक, एअर इंडिया आदी उद्योगातील २५० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण मिलगिर यांनी तर सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मुंबईचे सचिव संदीप कदम यांनी केले.

# घाटकोपरच्या झुनझुनवाला कॉलेजमध्ये समर्थन संस्थेच्या वतीने दिव्यांग आणि आर्थिकदृष्टया दुर्बळ युवकांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी**

घाटकोपरच्या झुनझुनवाला कॉलेजमध्ये समर्थनम् संस्थेच्यावतीने दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ युवक युवतीसाठी भव्य रोजगार मिळाव्याचे आयोजन दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले असल्याचे या संस्थेचे क्षेत्रिय अधिकारी जितेंद्र कर्णिक यांनी सांगितले आहे.या संस्थेने जवळजवळ हजारो युवक युवतीसाठी रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे. आणि हा प्रयत्न सातत्याने सुरु आहे. या माध्यमातून ह्या सर्व युवकांना रोजगार उपलब्ध करुन देताना त्यांचा आत्मविश्वास कसा वाढवता येईल, त्यांना जगण्याची प्रेरणा कशी मिळेल हा मनी भाव ठेवून संस्था कार्यरत आहे.

या संस्थेने मार्फत विनामूल्य संगणक प्रशिक्षण, इंग्लिश स्पिकिंग स्कील प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय या संस्थेमध्ये विनामूल्य जेवण दिले जाते. तसेच निवासाची सोय आहे.अशा संस्थेमध्ये योगदान देणारे उच्चशिक्षित ऋषिकेश पवार, तेजल हांडे, मानसी माऊकर, शिवशंकर



आदी सारखे युवक युवती सर्मपण भावनेने कार्यरत असताना दिसून येईल असे त्यांनी सांगितले.

## परळीच्या युवकाची थेट दुबईत बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजर पदी निवड

# परळीसह बीड जिल्ह्याच्या शिरपेचात इंजि.राजू जगतकर यांच्यामुळे आणखी एक मानाचा तुरा

**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्हा म्हटलं की दुष्काळी भाग कधी ओला तर कधीच कोरडा दुष्काळ या बीड जिल्ह्याने नेहमीच पाहिला आहे. यात शेतकऱ्यांची पोरं आता शेती नको शिक्षण हवं याच दृष्टिकोनातून शिक्षणाच्या पाठी लागले आहेत मात्र शिक्षण करूनही नोकरीचा किंवा नोकरी मिळण्याच्या संधीची नेहमीच वाट बघतात मात्र कधी नोकरीचा विषय जरी आला तर भरमसाठ पैसा द्यावा लागतो. असे एक गणित सध्या बीड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या उराशी गाठ बांधली असल्याचे पाहायला मिळतात, मात्र परळीतील एका सर्वसामान्य कुटुंबातील युवकांनी या सगळ्या गोष्टीचा कोणताही विचार न करता आपल्या शिक्षणाला एक ध्येय आणि एक यशाची पायरी म्हणून शिक्षण घेत राहिला आणि तब्बल बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातुन थेट दुबईपर्यंतचा प्रवासस्थाने आपल्या संघर्षातून पार पडला परळीचे भूमिपुत्र आणि इंजिनीयर राजू श्रावणराव जगतकर हे आज महाराष्ट्रात नव्हे भारतात नव्हे तर थेट आता नोकरी करणार आहेत ते दुबईमध्ये दुबईमध्ये जाण्याआधी त्यांनी दिल्ली व मुंबई येथे वेगवेगळ्या पदावर मेट्रो रेल्वेचे काम पाहिले आहे. याच त्यांच्या अनुभवी आणि कौशल्य पूर्व नेतृत्वाला जोपासून ठेवलं आणि याचीच संधी आता थेट त्यांना दुबई येथे मिळाली आहे दुबई येथे ते आता बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजर पदी त्यांची दुबईच्या सरकारने निवड केली आहे.यामुळे आता बीड जिल्ह्याच्या शिरपेचावर मानाचा आणखी एक तुरा खवल्या गेला आहे. इंजि राजू जगतकरांना ही संधी मिळाल्यानंतर परळी तालुक्यात मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी जणू काही दिवाळीत साजरी केली आहे. कारण नेहमीच बीड जिल्हा हा कोणत्या ना कोणत्या वादात महाराष्ट्राने पाहिला मात्र



याच बीड जिल्ह्यातील अनेक युवकांनी बीड जिल्ह्याच्या शिरपेचावर अनेक मानाचे तुरे खवले आहेत हे देखील उल्लेखनीय आहे. यामध्ये इंजि.राजू जगतकर हे बीड जिल्ह्यातील कौशल्यपूर्ण असलेले संपादक बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू आहेत. यामध्ये मोठ्या बंधू व आई वडील यांचे आशीर्वाद आणि त्यांच्या मार्गदर्शनाने राजूने आपलं ध्येय गाठलंच नाही तर परळी, बीड जिल्हा असो किंवा महाराष्ट्र किंवा देश असो या देशावर देखील आ[illegible] देशात राहून दुसऱ्या देशात आपलं कौशल्य दाखवू शकतो हे दाखवून दिलं आहे. यासाठी इंजि राजू जगतकर यांचं परळी व बीड जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

परळी येथे इंजि. राजू श्रावण जगतकर व त्यांच्या पत्नी मुंबई मेट्रो रेल्वेस्टेशन मास्तर अपर्णा राजू जगतकर यांचा परळीतील निवासस्थानी शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन परळी समाचारचे संपादक आत्मलिंग शेटे,राजेश साखरे सहशिक्षक वैद्यनाथ विद्यालय, रामकिशन सावंत, प्रमोद सावंत, श्रावणराव जगतकर, कासुबाई जगतकर,बालाजी जगतकर, केशरबाई गायकवाड, वंदना जंगले, सिद्धार्थ जगतकर, संजय जोगदंड,राज जगतकर, रावसाहेब जगतकर, ब्रिजेश जगतकर, मुकुंद जगतकर, प्रताप समुद्रसवळे, सिद्धार्थ जगतकर, मिलिंद विद्यालयातील सर्व वर्गमित्र आदी दिसत आहेत.

## बचपन बालविद्या मंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात;चिमुकल्यांनी धरला गाण्यावर ठेका

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील धारूर रोडलगतच्या बचपन बाल विद्यामंदिर चे स्नेहसंमेलन मुक्ताबाई लॉन्स मध्ये शनिवार रोजी झाले. कार्यक्रमाचे उदघाटक नगराध्यक्ष सीताताई बन्सोड , प्रमुख उपस्थिती पत्रकार रामदास तपसे,डॉ अशोक चाटे,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,डॉ हनुमंत सौदागर, संजय राख राख,बचपन बाल विद्यामंदिर चे विनायक कराड, यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी हनुमंत भोसले म्हणाले पालकांनी विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे. केजचा सांस्कृतिक वारसा जपावा असे आवाहन केले. सीताताई बनसोड म्हणाल्या शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांवर संस्कार होणे आवश्यक आहे. मुलांच्या आहारावर मातांनी लक्ष दिले पाहिजे असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, कला संगीत हे महत्त्वाचे आहे. सांस्कृतिक



कार्यक्रमातून विद्यार्थी घडतो असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गीत सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. माऊली माऊली ,यांसह मराठी,हिंदी गीत ,लावणी नृत्य सादर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षिका वैशाली कराड,ज्ञानेश्वरी सत्वधर,रुपाली बोबडे व त्यांच्या टीम ने परिश्रम घेतले सूत्रसंचालन रुपाली बोबडे,अजलान तांबोळी यांनीकेले.कार्यक्रमास नागरिक ,पालक,मोठया संख्येने उपस्थित होते.

## दिल्लीतील पराभव स्पष्ट दिसत असल्यानेच विरोधकांचा फेक नरेटिव्ह पसरवण्याचा प्रयत्न–आ.प्रविण दरेकर

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषद घेत महहाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवरून निवडणूक आयोगाविरोधात विधान केले. त्यांच्या या विधानाला भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधींसह विरोधक तिच तिच कॅसेट पुन्हा वाजवत आहेत. निवडणूक आयोगाने याआधीही आपली भुमिका स्पष्ट केली आहे. राहुल गांधींनी केलेल्या आरोपांना आयोग समर्पक असे उत्तर देईल. दिल्ली निवडणुकीत पराभव स्पष्ट दिसत असल्याने आतापासूनच फेक नरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न विरोधकांचा सुरू आहे, अशी टीका दरेकरांनी केली.

आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले कि, महाराष्ट्रात मविआने तिच कॅसेट वाजवली. तिच कॅसेट नव्याने राहुल गांधी सुप्रिया सुळे आणि संजय राऊत यांना बाजूला बसवून वाजवताहेत. यावरून राजकारणातील पोरकटपणा दिसून येतोय. राहुल गांधींना सुर सापडत नाही. पक्षाची वाताहत होतेय त्याकडे लक्ष देऊन पुन्हा उभं राहायची हिम्मत गळाली असूनही तिच तिच कॅसेट पुन्हा वाजविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. लोकांना तुमच्या नौटंकीची सवय झालीय. विरोधकांना दिल्लीतील पराभव स्पष्ट दिसतोय. पराभवाची मानसिकता आताच करून त्याचे विश्लेषण करण्यासाठीचा, फेक नरेटिव्ह पसरविण्याचा हा प्रयत्न आहे. परंतु दिल्लीची जनता भाजपाला बहुमत देईल आणि तेथील विकासासाठी पुन्हा एकदा दालन खुले होईल, असेही दरेकर म्हणके. ठाकरे गटाच्या खासदारांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेवर आ. दरेकर म्हणाले कि, एकनाथ शिंदे यांनी ज्यावेळी उठाव केला त्यावेळेस उद्धव ठाकरेंसोबत वर्षावर उदय सामंत, गुलाबराव पाटील हे सारे नेते होते. बरेचसे नेते बैठक घेऊन शिंदेंसोबत गेले. त्यामुळे आपल्या पत्रकार परिषदेत आले म्हणजे जाणार नाही यावर त्यांचा विश्वास असेल तर आनंद आहे. परंतु उबाठा गटात बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देण्यात आलीय. बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेसवर टीका–टिप्पणी केली त्या काँग्रेससोबत बसणे सच्चा शिवसैनिकाला अस्वस्थ करतेय. उद्धव ठाकरे उबाठा शिवसेना किती पुढे नेतील याबाबत ते साशंक आहेत. खासदारांना त्यांच्या मतदार संघात केंद्र व राज्याच्या माध्यमातून विकास करण्यासाठी सरकारची मदत गरजेची आहे. अशा प्रकारच्या वेगवेगळ्या अर्थाने हे खासदार शिंदे यांच्यासोबत जाऊ शकतात किंवा वेगळा पर्याय स्वीकारु शकतात, असेही दरेकरांनी म्हटले. अरविंद सावंत यांच्या वक्तव्यावर दरेकर म्हणाले कि, आपल्याला ठेच लागल्यावरही उबाठा दुरूस्त होत नाही. शिंदे यांना गृहीत धरत गेले आणि ते संपूर्ण शिवसेना सोबत घेऊन गेले, त्याचा थांगपत्ताही लागला नाही. तशाच प्रकारची स्थिती आता असून ते मान्य करायला तयार नाहीत. बीड आणि या प्रकरणाचा संबंध काय? त्यामुळे ते संभ्रमित झालेत. त्यातून त्यांना नेमकं काय करावे हे संजय राऊत यांच्यासह उबाठा नेत्यांना सुचताना दिसत नाही.

## तुमच्या मुलांना कशाचे टेन्शन तर नाही ना ?-डॉ.जगदीश टेकाळे

### अल्पवयीन मुलांमधील आत्महत्येचे प्रकार चिंताजनक

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलांकडुन होणाऱ्या आत्महत्या पालकांची चिंता वाढवणारे ठरत आहे. किरकोळ कारणावरुन मुलांकडुन टोकाचे पाऊल उचलले जात आहे. यावरुन मुलांची सहनशीलता कमी होत असुन, त्यांच्यातील मानसिक तणावही उघड होत आहे. त्यामुळे तुमच्या मुलाला टेन्शन तर नाही ना, असा प्रश्न प्रत्येकाला पडला आहे.

जिल्ह्यात घडणाऱ्या आत्महत्येच्या घटनांमध्ये प्रौढ व्यक्तीसह अल्पवयीन मुले–मुलींचाही समावेश असल्याचे समोर येत आहे. किरकोळ कारणावरुन त्यांच्याकडुन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले जात आहे. त्यामध्ये कौटुंबिक वादासह अभ्यासाचा तणाव व चुकीचे पाऊल पडल्याने उद्भवलेले प्रसंग अशा कारणांचा समावेश दिसून येत आहे. पालकांच्या मुलांकडुन अपेक्षा वाढत असल्याने त्यांच्यावर अभ्यासाचा भार टाकला जात आहे. अशा अनेक कारणांतून मुलांचा मानसिक ताण वाढत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मुलांच्या मनातील अपेक्षा पालकांनी समजून घेणे गरजेचे आहे. कारणे काय?



अभ्यासाचे टेन्शन : काही प्रकरणांमध्ये अभ्यासाचा ताण असह्य झाल्याने मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. इतर कारणे :– घरात भांडण झाल्यास किंवा हट्ट पुरवला न गेल्यास देखील मुलांकडुन आत्महत्या केली जाते. आत्महत्येचे विचार वाढतात – नकारात्मक मानसिकता आणि वाढत्या अपेक्षा यामुळे आत्महत्येचे विचार बळावतात. कुटुंबीयांशी सुसंवाद वाढला पाहिजे. तसेच आपल्या पाल्यामध्ये काही बदल जाणवत असतील तर मानसोपचारतज्ज्ञांच्या सल्ल्याने आत्महत्याचे प्रमाण कमी होऊ शकते. संवाद गरजेचा १) काही घटनांमध्ये एखाद्या मुलीने चुकीचे पाऊल टाकल्याने ओढवलेल्या प्रसंगात आत्महत्या केल्या आहेत. २) या घटनांना आळा घालण्यासाठी संवाद वाढण्याची गरज आहे. चर्चा करावी मुलांवर शिक्षणाचे किंवा इतक कसलेही दडपण येणार नाही, ही काळजी घ्यायला हवी. शिक्षणासोबतच खेळासाठी पुरेसा वेळ द्यायला हवा. यामुळे त्यांचा ताण कमी होऊ शकतो. मुले शाळेत असल्यावर शिक्षक त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करतात. तसेच पालकांनी देखील त्यांच्याशी मैत्रीपुर्ण संवाद साधला पाहिजे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

## कर्ज देण्याच्या बहाण्याने १७ लाखांची फसवणूक

### दिलीप प्रभूणे अटकेत

**सातारा । प्रतिनिधी**

बांबू प्रोसेसिंग युनिटसाठी परदेशातून कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दिलीप अरविंद प्रभूणे (वय ५५, रा. शाहू नगर, गोडोली, सातारा) याला पोलिसांनी अटक केली आहे.फिर्यादी कुशल सातापा कुकडे (रा. आपटे नगर, कोल्हापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ११ फेब्रुवारी ते २२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रभूणे मॅनेजमेंट कन्सल्टन्सीच्या कार्यालयात ही घटना घडली. प्रभूणे यांनी परदेशी कर्ज मिळवून देण्याचे आश्वासन देत कुकडे यांच्याकडून १२.९० लाख रुपये उकळले. मात्र, कर्ज मंजूर न झाल्याने फसवणुकीचा प्रकार उघड झाला.तसेच बाजीराव जोती पाटील (रा. वाडी भागाई, ता. शिराळा, जि. सांगली) यांच्यासह अन्य व्यक्तींकडूनही प्रभूणेने ४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून उपनिरीक्षक जायपत्रे तपास करत आहेत.

# नागसेन बुद्ध विहार बीड येथे माता रमाई यांची १२७ वी जयंती हर्ष उल्हासात साजरी

## माता रमाई यांच्या जयंतीदिनी प्रो.डॉ राणी जाधव यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

लहानपणी शाळेतील वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेणाऱ्या भिवाला जीवनसाथी म्हणून सुभेदार रामजीबाबांनी बापाविना पोरकी असलेल्या रमाईला सून म्हणून आपल्या घरी आणले. या माता रमाईने कोणत्याही प्रकारच्या सुखाची अपेक्षा न करता प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेबरुपी महासागरा बरोबर संसार करताना जीवनभर दुःखाच्या अनेक लाटा सहन केल्या. अतिउच्च शिक्षण घेतलेल्या डॉ.बाबासाहेबानी खोऱ्यानी पैसा ओढला असता परंतु अंधारात खितपत पडलेल्या दीनदलीत समाजाच्या, स्त्री पुरुषांच्या उद्धाराकरिता,व देशाच्या प्रगती करता जीवनभर कष्ट केले.आपल्या सुखी संसाराकडे,आपल्या आर्थिक परिस्थितीकडे त्यांनी लक्ष दिले नाही. औषध पाण्याशिवाय, वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे ४ लेकरांना गमवावे लागले त्या थोर त्याग मूर्ती रमाईचा आज २१ व्या शतकातील कोणत्याही स्त्री पुरुषांना विसर पडू नये असे भावपूर्ण उदगार माया दिवाण यांनी काढले. आपल्या पतीच्या शिक्षणाकरता पै पै जमा करण्या करीता गवऱ्या थापून संसार करणाऱ्या व पती अतिउच्च शिक्षण घेऊन मायदेशी परत आल्यावर त्यांच्या अंगावर धड लुगडे ही नाही याचा विचार न करता थोर छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांना सत्कार प्रसंगी दिलेला फेटा नेसून स्वतःला गर्दीत लपवून डॉ. बाबासाहेबांचा सत्काराचा सोहळा पाहण्याचा माता रमाईचा तो हृदयस्पर्शी प्रसंग माया दिवाण यांनी सांगतांना श्रोत्यांचे डोळे पाणावले.

नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती दिनी विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी आयु. केशरताई कांबळे अध्यक्षपदी लाभल्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून



सुप्रसिद्ध कवयित्री माया दिवाण उपस्थित होत्या,विचार मंचावर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय गढी येथील गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रो.डॉ राणी जाधव यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक से.नि जिल्ह प्रबंधक (एलआयसी) यु एस वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन बौद्धाचार्य ज्ञानोबा पोटभरे यांनी केले. याप्रसंगी प्रो.डॉ राणी जाधव यांची पीएच.डी करित असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून निवड व प्रोफेसर पदी पदोन्नती झाल्याबद्दल नागसेन बुद्ध विहाराच्या वतीने यतोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी दान पारमिताचे पालन करून एडवोकेट राहुल मस्के यांनी आपल्या आईच्या पहिल्या स्मृतीदिनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या अनमोल ग्रंथाच्या बारा प्रति वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचायला बीड शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये वितरित करण्यासाठी दिल्या होत्या त्यापैकी दोन ग्रंथ वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचनालयामार्फत विहार समितीकडे सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी प्रो.डॉ राणी जाधव, प्रा व्ही आर गाडे, आयु पुष्पाताई वडमारे त्यांनी देखील माता रमाईच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्ञानोबा पोटभरे यांनी केले. कार्यक्रमास नागसेन बुद्ध विहारातील सदस्य, परिसरातील बहुसंख्या बंधू–भगिनींची व बालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता सरणातयने झाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077